# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 30/11/2019 (शनिवार)
# (सायंकाळ)

---

## अपर पोलीस अधीक्षक यांच्याकडुन सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना भावपुर्ण निरोप

दिनांक 30/11/2019 रोजी नागपूर (ग्रामीण), पोलीस दलातुन सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर (ग्रामीण), येथे निरोप देण्याकरीता आमंत्रित करण्यात आले. यावेळी एका ''निरोप समांरभाच्या'' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सेवानिवृत्त होणाऱ्या 1) पोलीस उपअधिक्षक गृह श्री. संजय जोगदंड, पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, 2) सहायक पोलीस निरीक्षक श्री. रमाशंकर मुन्नासिंग ठाकुर, महामार्ग पथक नागपुर व 3) सहायक फौजदार श्री. नामदेव गोविंदराव सहारे, पोलीस मुख्यालय नागपुर ग्रामीण यांना अपर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तु देवून निरोप देण्यात आला आहे. तसेच सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांना अपर पोलीस अधीक्षक यांनी त्यांना पुढील आयुष्य सुख समृध्दीचे व आरोग्य संपन्न राहावे अश्या शुभेच्छा दिल्या. सेवानिवृत्ती नंतर त्यांचा कोणत्याही प्रलंबित कार्यालयीन कामकाजात अडथळा होणार नाही अशी ग्वाही अपर पोलीस अधीक्षक यांनी यावेळी दिली. तसेच पोलीस दलातील सेवानिवृत्त पर्यंतचा कालावधी हा यशस्वीरीत्या पार पाडला याबद्दल अपर पोलीस अधीक्षक यांनी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची प्रशंसा केली.

या कार्यक्रमाला अपर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार, वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. संजय पुरंदरे व कार्यालयातील इतर अधिकारी व कर्मचारी (स्टाफ), उपस्थित होते.





## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत शासकीय रूग्णालय भंडारा/आजनगाव, ता. मौदा दरम्यान कु. रविना मनोहर बोबडे, वय 19 वर्ष, रा. आजनगाव हिने अज्ञात कारणातुन विषारी औषध प्राशन केले. प्रकृती खराब झाल्याने उपचाराकरीता रविना बोबडे हिला शासकीय रूग्णालय, भंडारा येथे नेले असता दि. 24/11/19 चे 13:45 वा. तीचा मृत घोषित केले. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे महिला पोलिस हवालदार सुनंदा व्यवहारे, पो. स्टे. मौदा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस शिपाई हटवार हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर